# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 25/06/2020 (गुरूवार)
(सकाळ)

### चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि.मी. चिचपुरा नवेगाव रेल्वे, ता. मौदा येथे दिनांक 23/06/2020 चे 21:00 वा. ते दिनांक 24/06/2020 चे 04:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुगुनाकर रेड्डी मोलाका, वय 45 वर्ष, रा. नवेगाव रेल्वे ता. मौदा यांच्या घरातील कपाटाचा अज्ञात आरोपीने कुलुप उघडुन कपाटामध्ये ठेवलेल सोन्याचे दागिने कि. 1,50,000/–रू. व नगदी कि. 1,40,000/–रू. असा एकुण कि. 2,90,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा देशमुख 9922447045 हे करीत आहे.

### जबर दुखापत

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 12 कि. मी अंतरावर मौजा पीएचसी पाटणसावंगी परीसर येथे दिनांक 23/06/2020 चे 22:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिपक तातोबाजी गभने, वय 28 वर्ष, रा. सावित्रीबाइ फुले नगर, नागपुर व आरोपी नामे– संतोष मस्तराम सयाम, वय 35 रा.सिवनी (मध्यप्रदेश) हे पी एच सी पाटणसावंगी नवीन इमारतीचे बांधकामावर मिस्त्री व लेबर चे काम करीत असुन लेबर पेमेन्टचे वादावरून आरोपीने लोखंडी पाइपने फिर्यादीच्या उजवे पायावर, डावे हातावर, तोंडावर व डोक्यावर मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 326 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा नागरे 9011596500 हे करीत आहे.

# अपघातात मृत्यु

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 14 कि.मी. अंतरावरील गोंडखैरी टोल नाका जवळ येथे दिनांक 20/06/2020 चे 15:00 वा. दरम्यान आरजे– 28/ जीए– 2684 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– नैमुद्दीन अलाउद्दीन खान(मृतक), वय 50 वर्ष, रा. बकानी, जि. झलाबाड राजस्थान याने त्याच्या ताब्यातील ट्रक निष्काळजीपणे सुरू करून ट्रकला हेन्डब्रेक न लावता आरोपी हा ट्रक खाली उतरला. यानंतर आरोपी हा क्लिनरच्या साईडने जाऊन क्लिनरला बॅटरी तार कसण्यास सांगितले क्लिनर बॅटरीचे तार कसत असतांना ट्रक पुढे जावु लागला म्हणून ट्रकला थांबविण्यासाठी आरोपी हा क्लिनर साईडवरून निष्काळजीपणे ट्रकचे समोरून धावत ड्रायव्हर साईडला जात असता ट्रकच्या मधे सापडून गंभीर जखमी होउन स्वतःचे मरणास कारणीभुत ठरला. मर्ग क्र. 47/2020 चे चौकशीवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा चंद्रशेखर सावध, पो. स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार चंद्रशेखर सावध 9823821663 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर